

# रिधोरा येथे सायबर सुरक्षा कार्यक्रम

मातृभूमि वृत्तसेवा

। अकोला, दि. १६ ।

रिधोरा- ग्रामपंचायतमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती अभियानांतर्गत सायबर गुन्ह्यांचे वाढते स्वरूप, त्याचे प्रकार आणि हे गुन्हे होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी, याविषयी कार्यक्रम झाला.

शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाने क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर शाखेच्या सहकार्याने आयोजित केला होता. अभियानाचे समन्वयक डॉ. हरिदास खरात, सायबर वॉरियर्स तेजस्विनी राठोड, वैभवी गांगवते, शीतल फंदात, भाग्यश्री दोड यांनी ग्रामस्थांना ए. टी. एम. विषयी, बँकेतून येणारे फेक कॉल्स, मेसेजेस, ई-केवायसी, पासवर्ड पिन, लॉटरी, नोकरीबाबत विविध पद्धतीने ऑनलाईन फसवणूक कशी होते, यापासून कसे सुरक्षित राहावे, याविषयी सविस्तर माहिती सांगितली आणि ग्रामस्थांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.

सुरक्षा टिप्स असलेले माहितीपत्रकाचे यावेळी वाटप करण्यात आले. यावेळी सरपंच विशाल दंदी, प्रमोद चौधरी, धर्मेंद्र दंदी, मंगेश गवई, पवन अग्रवाल, रणजित तायडे आणि ग्रामस्थ उपस्थित होते. सरपंच, उपसरपंच आणि त्यांचे सहकारी यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य केल्याबद्दल डॉ. खरात यांनी आभार मानले.

Akola Edition
Oct 26,2023 page no. 1
Epaper: mathrubhumi vrutseva.com